**ठळक बातम्या**

- पारंपरिक समुदायांच्या ज्ञानाकडे दुर्लक्ष न करण्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं नवसंशोधक आणि उद्योजकांना आवाहन

- प्रयागराजमध्ये रस्ते अपघातात १० जणांचा मृत्यू, १९ जण जखमी

- प्रसिद्ध बंगाली गायक प्रतुल मुखोपाध्याय यांचं कोलकाता इथं प्रदीर्घ आजारानं निधन

**आणि**

- महिला प्रीमिअर लीग टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज मुंबई इंडियन्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात सामना

**<><><><><>**

नवसंशोधक आणि उद्योजकांनी पारंपरिक समुदायांचं उपजत ज्ञान दुर्लक्षित करता काम नये असं आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. त्या आज झारखंडमध्ये रांची इथं मेसरा इथल्या बिर्ला तंत्रज्ञान संस्थेच्या अमृतमहोत्सव सोहळ्यात बोलत होत्या. ए आय अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि यंत्रशिक्षण यांच्यात झालेल्या अनोख्या बदलांमुळे भविष्यात नाट्यमय परिवर्तन अनुभवायला मिळेल असं त्या म्हणाल्या. विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी युवकांचा उत्साह आणि वचनबद्धता महत्वपूर्ण भूमिका निभावत असल्याचं त्यांनी सांगितलं. विज्ञान, अभियांत्रिकी, तंत्रज्ञान आणि गणिताच्या शिक्षणात मुलीही मागे नसल्याचं मुर्मू यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

फ्रान्स आणि अमेरिकेचा दौरा आटोपून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी काल रात्री मायदेशी पोहोचले. त्यांच्या या दौऱ्याबद्दल अमेरिकेच्या गुप्तचर खात्याच्या संचालक तुलसी गॅबार्ड यांनी आभार व्यक्त केले आहे. दोन्ही देशातले संबंध आणखी दृढ करण्यासाठी नरेंद्र मोदी यांचं स्वागत करणं हे सन्मानाचं असल्याचं त्या म्हणाल्या.

<><><><>

प्रयागराज जिल्ह्यात कार आणि बसची जोरदार धडक होऊन झालेल्या अपघातात दहा जणांचा जागीच मृत्यू झाला असून एकूण १९ जण जखमी झाले आहेत. छत्तीसगड राज्यातल्या कोरबा इथून प्रयागराज कडे जाणारी गाडी प्रयागराजहून वाराणसीकडे जाणाऱ्या बसवर आदळल्यानं हा अपघात झाल्याचं प्रयागराजचे  पोलीस आयुक्त तरुण गाबा यांनी सांगितलं.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी अपघातात मरण पावलेल्यांना श्रद्धांजली वाहिली असून जखमींना लवकरात लवकर बरं वाटावं, अशी सदिच्छा समाज माध्यमांवर व्यक्त केली आहे. तसंच उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी झालेल्या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला असून जखमींवर योग्य उपचार करण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनाला दिले आहेत.

<><><><>

गुजरात राज्यातल्या दाहोद जिल्ह्यात आज पहाटे झालेल्या रस्ते अपघातात चार जण जागीच ठार झाले तर सहा जण जखमी झाले आहेत. लिमखेडाजवळ इंदोर-अहमदाबाद महामार्गावर आज पहाटे साधारणपणे पावणे तीन वाजता  हा अपघात झाला. प्रयागराज इथल्या महाकुंभावरून हे यात्रेकरू घरी येत असताना पर्यटक व्हॅन रस्त्यात थांबलेल्या ट्रकवर आदळून हा अपघात झाला. मृतांमध्ये एका महिलेचा समावेश आहे. सर्वजण भरूच जिल्ह्यातल्या अंकलेश्वर आणि अहमदाबादच्या ढोलका इथले रहिवासी आहेत. जखमींना रुग्णालयात दाखल

करण्यात आलं असून त्यांच्यावर उपचार सुरु असल्याची माहिती स्थानिक पोलिसांनी दिली आहे.

**<><><><>**

देशाच्या मत्स्यउत्पादनात मोठी वाढ झाली असून गेल्या दहा वर्षात ते दुप्पट झालं आहे, असं मत्स्यव्यवसाय मंत्रालयानं सांगितलं आहे. भारत आता जगातला दुसरा सर्वात मोठा मत्स्य उत्पादक देश झाला असून जागतिक मत्स्य उत्पादनात भारताचा वाटा ८ टक्के आहे, वर्ष २०१३-१४ मधल्या ९५ लाख टनांवरून २०२३-२४ मध्ये ते १८४ लाख टन इतकं झालं आहे. केंद्र सरकारनं मत्स्यव्यवसाय क्षेत्रासाठी यंदाच्या अर्थसंकल्पात आतापर्यंतची सर्वाधिक २ हजार ७०३ कोटी रुपयांहून अधिक तरतूद केली आहे.

**<><><><>**

विधी विद्यापीठातून केवळ कायद्याची अक्षर ओळख करून घेण्याऐवजी कायद्यामागची भूमिका, इतिहास , कायद्याचा व्यावहारिक उपयोग आणि अंमलबजावणी समजून घेणं आवश्यक असतं, असं प्रतिपादन सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी आज केलं. नागपूरच्या वारंगा इथल्या महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ-नागपूर, चा तिसरा दीक्षांत समारंभ आज झाला, त्यावेळी मुख्य अतिथी म्हणून ते संबोधित करत होते. या समारंभात, एकूण १५५ पदवीधरांना पदव्या प्रदान करण्यात आल्या. ज्यामध्ये ११२ पदवीपूर्व पदव्या, २८ पदव्युत्तर पदव्या आणि १५ पीएच.डी. पदव्या समाविष्ट होत्या.

**<><><><>**

बळजबरीनं केलं जाणारं धर्मांतर आणि लव्ह जिहाद विरोधातल्या नव्या कायद्यातल्या कायदेशीर बाबींचा अभ्यास करण्यासाठी राज्य सरकारनं राज्याच्या पोलिस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समिती स्थापन केली

आहे. या समितीत महिला आणि बालकल्याण विभाग, अल्पसंख्याक व्यवहार विभाग, विधी आणि न्याय विभाग, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग या विभागांचे सचिव तसंच गृह विभागाच्या उपसचिवांचा समावेश आहे.

ही समिती बळजबरीनं केलं जाणारं धर्मांतर आणि लव्ह जिहाद विषयी राज्यातल्या सद्यस्थितीचा अभ्यास करेल,आणि यासंदर्भातल्या तक्रारींवरील कार्यवाहीसाठीच्या उपाययोजना सुचवणार आहे. यासोबतच ही समिती या मुद्यांशी संबंधीत इतर राज्यांमधल्या कायदेशीर तरतुदी आणि कायदेही तपासून पाहणार आहे.

या संदर्भात राज्य सरकारनं शुक्रवारी रात्री उशिरा अधिसूचना जारी केली होती.

**<><><><><>**

आत्मपरीक्षण आणि जागरूकता हे दोन महत्वाचे गुण आहेत. त्याआधारे विद्यार्थी आपल्या विचारसरणीत स्पष्टता आणि लवचिकता आणून ध्येयपूर्तीचा मार्ग निश्चित करू शकतात, असं प्रख्यात आध्यात्मिक मार्गदर्शक सद्गुरु जग्गी वासुदेव यांनी म्हटलं आहे. परीक्षा पे चर्चा  कार्यक्रमाच्या ‘मनःशक्तीचे सामर्थ्य’ या पाचव्या भागात त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला, त्यावेळी ते बोलत होते. शैक्षणिक क्षेत्रातल्या यशापेक्षाही आंतरिक वाढ महत्वाची असल्याचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा विश्वास असल्याचं त्यांनी सांगितलं. ज्ञानार्जन  हसतखेळत  असावं आणि संतुलित आणि चैतन्यशील मनाने शिक्षण घ्यावं, शिक्षण हे केवळ परीक्षांसाठी नाही हे समजून बुद्धीला कायम गतिशील ठेवावं, असा सल्ला त्यांनी दिला.

**<><><><><>**

सक्तवसुली संचालनालयानं राजमल लखीचंद ज्वेलर्सची १ कोटी ६९ लाख रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे. नाशिक आणि जळगावमध्ये ही संपत्ती आहे. बँकेची फसवणूक केल्याच्या गुन्ह्याअंतर्गत दोन दिवसांपूर्वी ही कारवाई झाली.

**<><><><>**

प्रसिद्ध बंगाली गायक प्रतुल मुखोपाध्याय यांचं आज कोलकाता इथं प्रदीर्घ आजारानं निधन झालं. ते ८२ वर्षांचे होते. सामाजिक प्रश्नांना वाचा फोडणारी गीतं कोणत्याही वाद्यांशिवाय गाण्यात त्यांचा हातखंडा होता. अमी बांग्ला गण गाई आणि डिंगा भाषाओ सागोर ही त्यांनी लिहिलेली आणि स्वरबद्ध केलेली गाणी विशेष गाजली. त्यांच्या निधनानं संगीत विश्वात शोककळा पसरली आहे.

**<><><><>**

परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी युक्रेनचे परराष्ट्रमंत्री आंद्रि सिबिहा यांची काल रात्री उशिरा जर्मनीतल्या म्युनिच सुरक्षा परिषदेत भेट घेतली. दोन्ही नेत्यांनी परस्पर सहकार्याच्या अधिक प्रगती बरोबरच युक्रेन संघर्ष सोडवण्याच्या दिशेनं सुरू असलेल्या प्रयत्नांवर चर्चा केली. डॉ. जयशंकर यांनी जर्मनीचे संरक्षणमंत्री बोरिस पिस्टोरियस यांची देखील भेट घेतली आणि द्विपक्षीय सहकार्य आणि युक्रेनच्या विकासावर चर्चा केली. परराष्ट्र मंत्र्यांनी जर्मनीच्या बव्हेरिया राज्याचे अध्यक्ष मार्क्स सॉडर यांची म्युनिच मध्ये भेट घेतली. यावेळी भारत-जर्मनी आर्थिक आणि तंत्रज्ञान सहकार्यावर चर्चा करत आंतरराष्ट्रीय परिस्थितीवर विचार विनिमय केला. त्याच वेळी सॉडर यांचं स्वागत करण्यासाठी भारत उत्सुक असल्याचं जयशंकर म्हणाले.

**<><><><>**

ब्रिटन आणि भारत यांच्यातले व्यापारी संबंध दृढ करण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिल्याबद्दल ब्रिटन सरकारनं टाटा समुहाचे अध्यक्ष एन. चंद्रशेखरन यांना मानद

नाइटहूड पुरस्कारानं सन्मानित केलं आहे. राजे चार्ल्स यांनी चंद्रशेखर यांना हा सन्मान प्रदान केला. या सन्मानाबद्दल चंद्रशेखर यांनी ब्रिटन सरकारचे आभार मानले आहेत.

**<><><><><>**

महिला प्रीमिअर लीग टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज मुंबई इंडियन्सचा सामना दिल्ली कॅपिटल्स विरोधात होणार आहे. आज संध्याकाळी साडेसात वाजता वडोदरा इथं हा सामना सुरू होईल.

दरम्यान काल  झालेल्या स्पर्धेच्या सलामीच्या सामन्यात गतविजेत्या रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूनं गुजरात जायंट्सचा ६ खेळाडू आणि ९ चेंडू राखून पराभव केला. विजयासाठी गुजरातनं दिलेलं २०२ धावांचं आव्हान रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूनं केवळ ४ खेळाडूंच्या मोबदल्यात पार केलं.

या सामन्यात गुजरातच्या वतीनं ॲश्ले गार्डनर हीनं सर्वाधिक ७९, तर बंगळुरुच्या वतीनं ऋचा घोष हीनं सर्वाधिक ६४ धावा केल्या.

**<><><><><>**

भारताच्या महिला आणि पुरुष दोन्ही संघांनी हाँगकाँग इथं सुरू असलेल्या आशियाई ज्युनियर सांघिक स्कॉश अजिंक्यपद स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. अनहत सिंग हीनं साखळी फेरीत सर्व सामने ३-० ने जिंकत, भारतीय महिला संघाला ब गटात दुसरं स्थान मिळवून दिलं, आणि भारताचं अंतिम चारमध्ये स्थान पक्क झालं.

**//<><><><><>//**